## दिवाणी किरकोळ अर्ज नं.१११/२०२५

| | | |
|---|---|---|
| MHRT020005082025 | **विजया विजय संसारे व इतर** | **..... अर्जदार** |
| | -- विरुध्द-- | |
| | **कोणीही नाही** | **..... सामनेवाले** |

### <u>निशाणी क्र.१ वरील आदेश</u>

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे कै.विजय गणपत संसारे यांचे वारस असल्याबाबतचा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथन संक्षिप्ततेत असे की, अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे व अर्जदार क्र.२ ते ४ हे मयताचे मुले आहेत. कै.विजय गणपत संसारे हे दि.१६/०६/२०१४ रोजी मयत झाले आहेत. कै.विजय गणपत संसारे हे सामाजिक वणीकरण विभाग कार्यालय, जिल्हा रत्नागिरी येथे शासकीय नोकरीत होते. कै.विजय नोकरीमध्ये इतरत्र कार्यरत असताना चिपळुण येथील स्टेट ऑफ इंडिया या बँकेचे खाते क्रं.३०४४४८६५५४७ मध्ये त्यांची रक्कम १,७९,९४२/- एवढी शिल्लक रक्कम आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदारांनी संबंधित बँकेकडे रक्कमेची मागणी केली असता बँकेने त्यांना मयताचे उत्तराधिकारी म्हणून प्रमाणपत्र आणण्यासाठी सांगितले

आहे. सबब, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**४.** अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री.एस.एच.पेडणेकर यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे निर्गती करीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे त्यावरील निष्कर्ष त्याच्या कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे:–

| **अनु. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणीप्रमाणे वारसा दाखला (Succession certificate) मिळणेस पात्र आहेत का ? | **...होय** |
| २. | काय आदेश ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत** –

मुद्दे क्र.१ व २ एकमेकांशी संलग्न असल्याने पुरावा व कथनांचे पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत चर्चित आहे.

**५.** प्रस्तुत अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी अर्जदार यांनी स्वतःचे व साक्षीदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अनुक्रमे निशाणी क्र.१४ व १६ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदारास स्टेट ऑफ इंडिया या बँकेमध्ये अकाऊंट नं.३०४४४८६५५४७ शाखा चिपळुण यांनी मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिलेल्या पत्राची मूळ प्रत (निशाणी क्र.१७), मयत कै.विजय गणपत संसारे यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची मूळ प्रत (निशाणी क्र.२०) व स्वतःचे आधारकार्डची प्रमाणित प्रती इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यानंतर निशाणी क्र.२१ अन्वये पुरशीस दाखल करुन पुरावा बंद केला आहे.

**६.** अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनाच्या पुष्ठ्यार्थ निशाणी क्र.२० येथे कै.विजय गणपत संसारे यांचा मृत्यूदाखला दाखल केलेला आहे. त्यावरुन कै.विजय गणपत संसारे हे दि.१६/०६/२०१४ रोजी मयत झाल्याची बाब अधोरेखीत होते.

**७.** अर्जदार हे कै.विजय गणपत संसारे यांची वारस असल्यासंदर्भात व प्रस्तुत अर्जास कोणाचीही हरकत असल्यास ती उपस्थित करण्या संदर्भातील दि.०७/१०/२०२५ रोजीच्या 'तरुण भारत', रत्नागिरी आवृत्ती या वर्तमानपत्रामध्ये जाहिर नोटीस (निशाणी क्र.१५) प्रसिध्द करणेत आली. परंतु आजतागायत प्रस्तुत अर्जास कोणीही हरकत नोंदवलेली नाही.

८. अर्जदार यांच्यातर्फे देण्यात आलेल्या शपथपत्र (निशाणी क्र.१४ व १६) मध्ये अर्जदार हे कै.विजय गणपत संसारे यांचे वारस असल्याबाबतचे कथन केले आहे. वर नमुद जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार हे कै.विजय गणपत संसारे यांचे वारस नाहीत अशी तक्रार कुणीही आजतागायत उपस्थित केलेली नाही. यावरुन अर्जदार हे कै.विजय गणपत संसारे यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. तसेच, स्टेट ऑफ इंडिया या बँकेमध्ये अकाऊंट नं.३०४४४८६५५४७ शाखा चिपळुण येथील मयताचे नावे असलेले बचत खाते शिल्लक असलेली रक्कम १,७९,९४२/- असे दिसून येते. त्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस म्हणून सदर रक्कम मिळण्यास पात्र आहेत. या मता प्रत मी आले आहे. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | प्रस्तुत अर्जदार हे **कै.विजय गणपत संसारे** यांचे वारस असल्याने त्यांचे नावे स्टेट ऑफ इंडिया, शाखाः चिपळुण या बँकेमधील खाते क्रं.३०४४४८६५५४ मध्ये शिल्लक असलेली रक्कम १,७९,९४२/- नियमाप्रमाणे व्याजासह मिळणेकरीता वारसा दाखला |

| | |
|---|---|
| | (Succession certificate) त्यांना विहीत न्याय शुल्क भरल्यानंतर प्रदान करण्यात यावा. |
| | (आदेश खुल्या न्यायालयात प्रसिध्द) |

**सही/-**

दि. १०/०२/२०२६

**(शबनम यु. शेख)**

**दुसरे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर,**

**रत्नागिरी.**